**प्रेस नोट**

दिनांक : १९/११/२०२०

# अभय योजने अंतर्गत थकबाकीदारांकडून करण्यात आलेली वसुली व केलेल्या कारवाईची मोहीम

विषय: अभय योजना सुरु झाल्यापासून इतक्या ७४,०७३ थकबाकीदारांनी जमा केले रक्कम रु. १८८.५२ कोटी मिळकत कर. सवलत दिली रक्कम रु. ८३.६४ कोटी.

६,५८,०९४ इतक्या मिळकतधारकांनी एकूण रक्कम रु.१०३४.०८ कोटी मिळकतकर जमा केला.

- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे १०.६१ लक्ष इतक्या मिळकती आहेत. अनेक मिळकतधारकांनी विविध कारणांमुळे वेळेवर मिळकतकर न भरल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार दरमहा २% शास्ती लावण्यात आलेली आहे. ही शास्ती दरमहा २% असल्यामुळे ती वाढत जावून थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. कोरोना विषाणूच्या जागतिक महामारीच्या साथीच्या पार्श्वभूमीवर मालमत्ता कर भरणे सुलभ व्हावे, याकरिता पुणे महानगरपालिकेने **दिनांक ०२/१०/२०२० ते ३०/११/२०२०** या कालावधीमध्ये अभय योजना राबविणे बाबतचा ठराव दिनांक ०१/१०/२०२० रोजी पारित केलेला आहे.

- सदर ठरावाप्रमाणे दिनांक **०२/१०/२०२० ते १९/११/२०२०** या ४९ दिवसांमध्ये **७४,०७३ इतक्या थकबाकीदारांनी १८८.५२ कोटी इतका** मिळकतकर महानगरपालिकेस जमा केलेला आहे. त्यामुळे **रक्कम रु. ८३.६४ कोटी इतकी** सवलत देण्यात आली आहे.

- **५० लाखांपुढील ज्या थकबाकीदारांनी थकबाकीची रक्कम भरलेली नाही, अशा थकबाकीदारांवर पुणे महानगरपालिकेतर्फे दिनांक १९/११/२०२० अखेर खालील प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.**

| अ.क्र. | दिनांक | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | ०९/११/२०२० | कुमार हौसिंग कॉर्पोरेशन लिमिटेड, वडगावशेरी | थकबाकी रक्कम रु.१,७३,००,००० पैकी १,२७,००,०००/- post dated cheque पुणे मनपाकडे जमा |
| २. | ०९/११/२०२० | एस.ए. इन्फोटेक प्रा.लि. आणि एम. एस. लुविश इन्फो, वडगावशेरी | थकबाकी रक्कम रु. १,०४,००,००० मागणीपोटी रक्कम रु. ५३,९८,३५० RTGS पुणे मनपाकडे जमा |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | १२/११/२०२० | वसंत सोनराज कावेडीया, कात्रज | रक्कम रु.५७,२१,२३५/- थकबाकी वर ७/१२ उताऱ्यावर पुणे महानगरपालिकेचा बोजा चढविण्यास मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट्स) यांचे ठराव क्र. १०/१०९ दिनांक १२/११/२०२० अन्वये मान्यता |
| ४. | १२/११/२०२० | मनीषा वसंतराव कावेडीया, कात्रज | रक्कम रु. ५४,४२,२४३/- थकबाकी वर ७/१२ उताऱ्यावर पुणे महानगरपालिकेचा बोजा चढविण्यास मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट्स) यांचे ठराव क्र. १०/१०८ दिनांक १२/११/२०२० अन्वये मान्यता |
| ५. | १९/११/२०२० | फ्लयुर हॉटेल्स प्रा.लि. सिव्हील लाईन (ढोले पाटील रोड) | थकबाकी रक्कम रु. १,०५,७१८३५ पैकी रु.५४,६७,५६४ D.D.द्वारे मनापाकडे जमा |
| ६. | १९/११/२०२० | जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., विमाननगर | रक्कम रु. ४१,८९,१४१ cheque द्वारे पुणे मनापाकडे जमा |
| ७. | १९/११/२०२० | श्री. संजय लागी , येरवडा | रक्कम रु.५,४६,८०६ थकबाकी पोटी मिळकत सील करण्यात आली |
| ८. | १९/११/२०२० | श्री. अशोक मित्तल, येरवडा | रक्कम रु.५,६९,२७८ थकबाकी पोटी मिळकत सील करण्यात आली |
| ९. | १९/११/२०२० | श्री. पाटील प्रभाकर दत्तू, वडगावशेरी | थकबाकी रक्कम रु. ३,५४,२६१/- पोटी पूर्ण रक्कम cheque द्वारे पुणे मनापाकडे जमा |
| १०. | १९/११/२०२० | हॉटेल रोज | रक्कम रु. १०,७०,२३४ पैकी रक्कम रु. ५,००,००० pdc cheque द्वारे पुणे मनापाकडे जमा |

Scanned with CamScanner

- काही ठिकाणी थकबाकी दारांनी पुढील १-२ दिवसात थकबाकी रक्कम जमा करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. वारंवार नोटीस बजावूनही थकबाकीदारांनी थकीत मिळकतकर जमा न केल्यास, अशा सर्व मिळकतीवर/ थकबाकीदारांवर दैनंदिन कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तरी, उर्वरित कालावधीमध्ये थकबाकीदारांनी जास्तीत जास्त या सवलतीचा लाभ घेवून, पुणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे, आवाहन करण्यात येत आहे.

- **दिनांक ०१/१२/२०२० पासून सदर थकबाकीवर शास्ती लागू होणार आहे. त्यामुळे अभय योजनेमुळे मिळणारा लाभ कमी होण्याची शक्यता आहे. तरी ३० नोव्हेंबर २०२० पूर्वी थकबाकी भरण्याची व्यवस्था करावी.**

- दिनांक ०१/०४/२०२० ते १९/११/२०२० अखेर **६,५८,०९४** इतक्या मिळकतधारकांनी एकूण रक्कम **रु. १०३४.०८ कोटी** मिळकतकर पुणे महानगरपालिकेकडे जमा केला आहे. मागील वर्षी याच कालावधीमध्ये रक्कम रु.९७६ कोटी जमा झाले होते.

- मालमत्ता कर भरणे सुलभ व्हावे, म्हणून पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील जवळच्या नागरी सुविधा केंद्रावर रोख व धनादेशाद्वारे स्वीकारण्यात येत आहे.

- नागरिकांनी नागरी सुविधा केंद्रावर गर्दी होणार नाही, फार काळ थांबावे लागणार नाही याची दक्षता घेवून सहकार्य करणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.

- **तथापि, नागरी सुविधा केंद्र सुरु राहणार असले तरी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होवू नये, या करिता नागरिकांनी जास्तीत जास्त online प्रणालीद्वारे "propertytax.punecorporation.org" या संकेतस्थळावरून मालमत्ता कर भरणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.**

(विलास कानडे)
सह महापालिका आयुक्त
कर आकारणी व कर संकलन
पुणे महानगरपालिका

Scanned with CamScanner